पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस / ४ / कावि / ६५० / २०१२
दिनांक :- २६ / ०४ / २०१२

प्रति,
मा. ........................................
सदस्य, क्रिडा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची सभा दिनांक - ०२ / ०५ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - ०२ / ०५ / २०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. क्रिडा समिति
**कार्यपत्रिका क्रमांक :- २**

दिनांक :- ०२/०५/२०१२ वेळ :- दुपारी ४ : ०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०२/०५/२०१२ रोजी दुपारी ४:०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०७/१२/२०११, २१/१२/२०११, ०४/०१/२०१२, २२/०२/२०१२ व ०७/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक ०४/०१/२०१२, २२/०२/२०१२ व ०७/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणे.
क) दिनांक १६/०४/२०१२ रोजी झालेल्या पहिल्या सभेचा (विशेष सभेचा) (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक १ :- पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोट्‌र्स असोसिएशन यांना आंतरकचेरी कबड्डी, कॅरम (पुरुष ) , कॅरम (महिला ), हॉकी, बुध्दीबळ, लॉन टेनिस, फुटबॉल जलतरण या ८ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेकामी आर्थिक पुरस्कार देण्यासाठी पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोट्‌र्स असोसिएशन यांना एकूण आर्थिक सहाय्य र.रु.१,३२,६००/- ( अक्षरी र.रु.एक लाख बत्तीस हजार सहाशे) अदा करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधीमधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे. ( दिनांक ०२/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमाक २ :- मनपा परिसरातील शालेय १०६ विद्यार्थी खेळाडूंना सन २०१० - २०११ ची क्रिडा शिष्यवृत्ती एकुण रक्कम रुपये ३,८२,०००/- अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ६५० / २०१२
दिनांक :- २६ /०४/२०१२

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आली आहेत.